**राज्य उत्पादन शुल्क विभागातील उप आयुक्त (व.श्रे.), राउशु संवर्गातून सह आयुक्त,राउशु या संवर्गात पदोन्नती देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन आदेश क्रमांक:- इएसटी-२७२६/प्र.क्र.१/राउशु-१**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०१ सप्टेंबर, २०२६.

## शासन आदेश-

राज्य उत्पादन शुल्क विभागातील उप आयुक्त (व.श्रे.) राज्य उत्पादन शुल्क (वेतनश्रेणी एस-२३: ६७७००-२०८७००) या निम्न संवर्गातून सह आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क (वेतनश्रेणी एस-२५: ७८८००-२०९२००) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०२५-२६ च्या निवडसूचीमधील खालील तक्त्यातील स्तंभ क्र.२ येथे नमुद अधिकाऱ्यांना सह आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क या संवर्गात पदोन्नती देण्यात येत असून, त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ४ येथे दर्शविण्यात आलेल्या पदावर त्यांची पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १. | श्री.विजय चिंचाळकर | भ.ज.ब. | सह आयुक्त (संगणकीकरण),आयुक्त कार्यालय, मुंबई. |
| २. | श्रीम.संगिता दरेकर | खुला | सह आयुक्त (प्रशासन), आयुक्त कार्यालय, मुंबई. |
| ३. | श्रीम.उषा राजेंद्र वर्मा | खुला | सह आयुक्त (मळी व मद्यार्क), आयुक्त कार्यालय, मुंबई. |

२. सदर पदोन्नती ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) सदर पदोन्नती करिता निवडसूची तयार करताना कोणीही ज्येष्ठ अधिकारी अनावधानाने वगळण्यात आलेले नाहीत अथवा अधिक्रमित झालेले नाहीत, याच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सा.प्र.वि./१६-ब यांच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सुचनांनुसार देण्यात येत आहे.

३) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या स्वरूपातील पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यास नियमितपणाचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

३. सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होउन पदाचा कार्यभार स्विकारावा व याबाबतचा अहवाल आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क यांनी शासनास सादर करावा.

४. सदरचे पदोन्नती आदेश हे सामान्य प्रशासन प्रशासन विभागाचे पत्र क्रमांक ईएसबी-११२६/प्र.क्र.५७/आस्थामं दि.२९.०५.२०२६ अन्वये आस्थापना मंडळ क्रमांक-२ यांनी सह आयुक्त,राउशु संवर्गाच्या सन २०२५-२६ च्या निवडसूची तयार करण्यास केलेल्या शिफारशीस अनुसरुन सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०९०११९२५०१७७२९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA
DIGAMBARRAO
AUTE

Digitally signed by RAVINDRA DIGAMBARRAO AUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department,
2.5.4.20=F05A6913F9DEE1F453C9A1C5A89D8C4897737BA8E4AC0EDF3F2C6E69E25F4108, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=CA98EFAC317508AB9B5820B47955BC1BABB173F20D25ABD816ED91A9B6B0F16C, cn=RAVINDRA DIGAMBARRAO AUTE
Date: 2026.09.01 19:25:52 +05'30'

**(रविंद्र औटे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा.उप मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) सचिव, राज्य उत्पादन शुल्क यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई व नागपूर,
६) संबंधित अधिकारी (आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क यांच्या मार्फतीने)
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
९) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
१०) कार्यासन अधिकारी, राउशु-२ व ३, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.